मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल सिव्हील याचिका क्रमांक ५०८/२०१७ व ११८१/२०१८चे प्रकरणी विशेष समुपदेशी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.श्री. रफिक दादा यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०११९/प्र.क्र. ४८/पोल-१०

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
२ रा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १ जून, २०१९.

संदर्भ शासन पत्र, विधी व न्याय विभाग क्र. ९१४-२०१८/इ शाखा, दिनांक १६.१०.२०१८

शासन निर्णय:

मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल सिव्हील याचिका क्रमांक ५०८/२०१७ व ११८१/२०१८चे प्रकरणी शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड.श्री. रफिक दादा यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दिनांक १६.१०.२०१८ च्या पत्राद्वारे विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री. रफिक दादा यांना वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १६.०६.२०१७ अन्वये मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयीन प्रकरणी नेमण्यात येणाऱ्या वकीलांच्या फी इत्यादी खर्चास मंजुरी देण्याबाबत प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये खालील नमुद व्यावसायिक फी चे दराप्रमाणे फी मंजूर करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) रु.३,५०,०००/- प्रति न्यायालयीन उपस्थिती

ब) रु.७५,०००/- विचारविनिमय, शपथपत्र तयार करणे व सादर करणे इत्यादी.

३. न्यायालयीन उपस्थितीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) (१०८), राज्य मुख्यालय पोलीस (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना - (२०५५ ००९७) २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०११४३२०३६२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.06.01 14:37:50 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि),गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ , मुंबई .
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. ॲड.श्री. रफिक दादा, अरारात बिल्डींग, ८९, नगिनदास मास्तर रोड, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.
७. विधी व न्याय विभाग (इ शाखा), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (पोल-१०).